# ''ग्रामीण विकासात प्रसार माध्यमांची भूमिका''

प्रा. विनोद बी. खेडकर
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, भामटी,नागपूर २२.

भारतीय संविधानाने प्रदान केलेल्या मुलभूत हक्का पेक्षा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा लाभ घेवून एक नवीन जीवनदृष्टी लाभलेल्या भारतीय प्रसार माध्यमांनी आपले स्थान बळकट केले आहे. प्रसारमाध्यमे हे भारतीय संविधानाचा एक महत्वाचा घटक आहेत. वर्तमान काळामध्ये प्रसारमाध्यमे ग्रामीण स्तरापर्यंत पोहचले असून समाज व्यवस्थेमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे काम प्रसारमाध्यमांचे स्थान महत्वपूर्ण आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये भारतीय शासनांच्या विविध योजना समाजापर्यंत कशा पोहचवायच्या हा प्रश्न निर्माण झाला होता. विकासाच्या कितीतरी योजना असुनही त्याचा लाभ भारतीय समाजाला होत नाही. भौमित्र देव यांच्या मते 'जेव्हा माहितीचा प्रवाह अधिक गतिमान असतो व विविध माध्यमांद्वारे माहिती उपलब्ध असते तेथे दारिद्र्याचे प्रमाण कमी असते.' डॅनियल लर्नर नुसार, जेव्हा माध्यमांद्वारे नवे विचार लोकांपर्यंत पोहोचतात तेव्हा त्यांना विकासाचे संदेश अधिक चांगल्या प्रकारे समजु लागतात. पारंपारिक समाज जेव्हा बदलतो, तेव्हा त्याच्या दृष्टिकोनात बदल घडवून आणण्याचे काम प्रसार माध्यमांना करावे लागते. प्रसारमाध्यमांमुळे ग्रामीण समाजाच्या विकासाची शतकाच्या प्रारंभी पासून टी.व्ही. चा प्रभाव अधिक प्रमाणात वाढला आहे. तसेच विविध जागतिक, राष्ट्रीय, राज्यीय व जिल्हा पातळीवर वर्तमानपत्रे, मासिके व साप्ताहिकांचे प्रमाण वाढले आहे. गावोगावी वाचनालये निर्माण झाली आहेत. यामुळे ग्रामीण विकासामध्ये या साधनांचा प्रभाव वाढत असून ग्रामीण कुटूंबाला विविध योजनांची माहिती याद्वारे प्राप्त होत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या योजना ग्रामीण स्तरापर्यंत पोहचविण्याचे काम वर्तमान प्रसार माध्यमांद्वारे होत आहे. वर्तमान काळामध्ये विविध वर्तमान पत्रे व टी.व्ही चॅनल हे शेतकरी व ग्रामीण जनतेसाठी कार्य करत आहेत. सकाळ समुहाचे साम टी.व्ही. व कृषी दर्पन, लोकमत, लोकसत्ता,पुण्यनगरी या प्रमुख वृत्तपत्रांद्वारे कृषी, उद्योग, माहिती तंत्रज्ञान, पर्यावरण इत्यादी चे कार्यक्रम चालवले जातात. तसेच रेडीओ (आकाशवाणी) द्वारे कामगार बंधु, शेती विषयक, आरोग्य, ग्रामीण विकासाच्या योजनांची अंमलबजावणी इत्यादी कार्यक्रम चालवले जातात.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये ग्रामीण समाजाने चालु आर्थिक वर्षात २०१८-१९ मध्ये शासनाच्या विविध योजनांचा घेतलेला लाभ व माहितीचा स्त्रोतांचा अभ्यास केला आहे. म्हणजेच ग्रामीण विकासामध्ये प्रसार माध्यमांची भूमिका तपासली जाणार आहे.

**पद्धतीशास्त्र -**

कोणतेही सामाजिक संशोधन करत असतांना शास्त्रीय पद्धतीचा वापर करावा लागतो. शास्त्रीय पद्धतीद्वारे केलेले संशोधन हे शास्त्रशुद्ध असते. त्यासाठी समस्यासुत्रण, उद्देश, गृहीतके, नमुना निवड पद्धती, क्षेत्रनिवड व संशोधन आराखड्याची निवड केली आहे.

**संशोधनाचे उद्दिष्ट्ये -**

१) शासनाच्या विविध योजनांचा घेतलेल्या लाभाचा अभ्यास करणे

२) लोकांना योजनांच्या घेतलेल्या लाभाच्या स्त्रोतांचा अभ्यास करणे.

३) ग्रामीण विकासामध्ये प्रसारमाध्यमांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधनाचे क्षेत्र -**

संशोधनाचे क्षेत्र म्हणून नागपूर जिल्ह्यातील उमरेड

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

तालुक्यातील परसोडी गट ग्रामपंचायतीची निवड केली आहे. या गट ग्रामपंचायतीमध्ये परसोडी, तिखाडी, उमरा, दुधा या गावांचा समावेश होतो.

**नमुना निवड -**

प्रस्तुत संशोधनासाठी गावातील शासकीय योजनांचा लाभ घेतलेल्या कुटूंबाची निवड केली आहे. संशोधकाने गैर संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक किंवा उद्देशपूर्ण नमुन्यांची निवड करून यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने ५० लाभार्थ्यांची अभ्यासासाठी निवड केली आहे.

**तथ्य संकलनाची पद्धती -**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक पद्धतीतील मुलाखत अनुसूची या तथ्य संकलन स्त्रोताची व दुय्यम पद्धतीतील प्रकाशित साहित्य, लेख, मासिके, वर्तमानपत्रे, ग्रामपंचायत रेकॉर्ड, इंटरनेटचा उपयोग केला आहे.

**राबविलेल्या विविध विकास योजना-**

परसोडी हे गाव नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यामध्ये असुन येथे गटग्रामपंचायत अस्तित्वात आहे.यामध्ये परसोडी, तिखाडी, उमरा, दुधा या गावांचा समावेश होतो. २०११ च्या जनगणनेनुसार या गावांची लोक संख्या ११७२ (परसोडी- ६०१, तिखाडी- २२१, उमरा- १२७, दुधा- १६३) इतकी असुन ३४८ उमरे (परसोडी- १९३, तिखाडी- ५०, ग्रामपंचायत पाहणी अहवाल. २०१८-१९. गट ग्रामपंचायत परसोडी ता. उमरेड, जि. नागपूर.

उमरा- ५५ व दुधा- ५०) आहेत. या ग्रामपंचायत अंतर्गत हागणदारी मुक्त गाव योजणे अंतर्गत सर्वांकडे संडास व्यवस्था असून १०० टक्के गाव हागणदारी मुक्त झाले आहे. गावातील लोकांचे असे मत आहे की, पंचायत समितीमध्ये कोणत्याही कामासाठी किंवा योजनेसाठी गेले असता अधिकारी 'संडास असेल तर बोला' या स्लोगण अंतर्गत संवाद साधतात.

या ग्रामपंचायतीमध्ये २०१८-१९ या कालावधी मध्ये सर्वांना घरकुल योजने अंतर्गत १०० कुटूंबांना घरे मिळाली आहेत. तसेच लोकांची जनधन योजने अंतर्गत बँकेमध्ये खाती आहेत. तर ३० कुटूंवांना जलसिंचन अंतर्गत विहिरी मिळालेल्या असून २०० लोकांनी गोपिनाथ मुंढे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ घेतला आहे. तसेच ५० कुटूंवांनी कृषी अर्ज योजने अंतर्गत शेतीसाठी कर्ज घेतले आहे. त्याच वरोवर सुकन्या समृद्धी योजने अंतर्गत ५० कुटूंव लाभ घेत आहेत. यावरून असे म्हणता येते की, विकासाच्या योजनांच्या अंमलवजावनी मध्ये लोकांचा प्रत्यक्ष सहभाग आहे. वहुतांश कुटूंवांनी शासकीय योजनांचा लाभ घेतला आहे.

गट ग्रामपंचायत परसोडी अंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना राबवल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने हागणदारी मुक्त गाव, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत रस्ते सुधार योजना, पानंद रस्ते, स्मशानभूमी, नाले बांधकाम, स्वच्छ भारत अभियान, इमारत बांधकाम (शाळा, ग्रामपंचायत, समाजमंदिर, वाचनालय), विद्यार्थ्यांना सायकल वाटप, पानलोट योजना किंवा कृषी सिंचाई योजने अंतर्गत, सिमेंट बंधारे, विहीरी व स्पिनक्युलर वाटप केले आहे. या सर्व योजनांची माहिती वेळोवेळी टी.व्ही. (दुरदर्शन), रेडीओ, वर्तमानपत्रे व विविध मासिकांमधुन मिळाली आहे असे सरपंचाचे मत आहे. जेव्हा जेव्हा वर्तमान पत्रामधुन योजनांची माहिती होते तेव्हा-तेव्हा आम्ही अधिकाऱ्यांकडुन त्याची चौकशी करून अंमलबजावणी करत असतो.

**उत्तरदाते वापरत असलेली प्रसारमाध्यमे**

उत्तरदाते वापरत असलेल्या प्रसारमाध्यमांचा अभ्यास

| अ.क्र. | वापरत असलेली प्रसार माध्यमे | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | वृत्तपत्र | – | – |
| २. | रेडीओ | ०४ | ०८% |
| ३. | टी.व्ही. | १९ | ३८% |
| ४. | इंटरनेट | ०२ | ०४% |
| ५. | वृत्तपत्र व टी.व्ही. | १५ | ३०% |
| ६. | वृत्तपत्र, टी.व्ही. व रेडीओ | ०६ | १२% |
| ७. | वृत्तपत्र, टी.व्ही. व इंटरनेट | ०४ | ०८% |
| | एकूण | ५० | १००% |

केला असता असे दिसून येते की, ०८: उत्तरदाते रेडीओचा वापर कर असून ३८: उत्तरदाते टी.व्ही. चा वापर करतात. तर ४: उत्तरदाते इंटरनेटचा वापर करतात. तसेच ३०: उत्तरदाते वृत्तपत्र व टी.व्ही चा वापर करत असून १२: उत्तरदाते वृत्तपत्र, टी.व्ही. व रेडीओ चा वापर करत आहेत. तर ०८: उत्तरदाते वृत्तपत्र, टी.व्ही. व इंटरनेटचा वापर करतात.

यावरून असे म्हणता येते की, सर्वाधिक ८८.८८: उत्तरदाते टी.व्ही. या प्रसार माध्यमाचा वापर करत आहे. ग्रामीण समाजामध्ये टी.व्ही. हे मनोरंजनाचे महत्वाचे साधन असून शासनाची ध्येय धोरणाचा प्रचार व प्रसार टी.व्ही. च्या माध्यमातून अधिक प्रमाणात होतो. विविध योजनांची माहिती जाहिराती व बातम्यांच्या माध्यमातून ग्रामीण जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम टी.व्ही. करते. त्याखालोखाल वृत्तपत्रांचा उपयोग करणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ५०: आहे. परसोडी या गावामध्ये ग्रामपंचायत कार्यालय व वाचनालय असून त्या ठिकाणी वृत्तपत्रे नियमित येतात. त्याचा उपयोग गावकरी करतात. थोडक्यात ग्रामीण समाजामध्ये शासनाच्या विविध योजनांची माहिती टी.व्ही. व वृत्तपत्रांमधून मोठ्याा प्रमाणात मिळते.

**उत्तरदात्यांकडे संडासाची सुविधा व त्यांच्या माहितीची स्त्रोत**

| अ. क्र. | उत्तरदात्यांकडे संडासची सुविधा | महितीचे स्रोत | | | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वृत्तपत्र | टी.व्ही. | इंटरनेट | वृत्तपत्र व टी.व्ही. | एकूण | |
| १. | सुविधा आहे | – | १५<br>३०% | – | ३५<br>७०% | ५० | १०० |
| २ | सुविधा नाही | – | – | – | – | – | – |
| | एकूण | – | १५<br>३०% | – | ३५<br>७०% | ६० | १०० |

उत्तरदात्यांनी शासनाच्या सर्वांसाठी संडास या योजनेचा लाभ घेतला आहे का व त्याच्या माहितीच्या स्त्रोताचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, १००: उत्तरदात्यांकडे संडास असून पैकी ३०: (१५) उत्तरदात्यांना टी.व्ही. च्या माध्यमातून योजने विषयी माहिती मिळाली असून ७०: (३५) उत्तरदात्यांना टी.व्ही. व वृत्तपत्रांमधुन या विषयीची माहिती मिळाली आहे.

थोडक्यात परसोडी गट ग्रामपंचायत ही १००: हागणदारी मुक्त गाव झाले असून टी.व्ही. या योजनेच्या माहितीचा मुख्य स्त्रोत आहे. त्या खालोखाल वृत्तपत्र हा माहितीचा स्त्रोत आहे. ग्रामीण भारतामध्ये दळणवळणाची सर्व साधने उपलब्ध झाली असून वृत्तपत्रे त्यांच्यामार्फत तात्काळ पोहचतात तर टी.व्ही. आहे. प्रमुख साधन बनले आहे. टी.व्ही. व वृत्तपत्रांमधुन शासन आपली ध्येय धोरणे व योजनांची माहिती सहजासहजी पोहचवित आहेत. त्यांचा प्रचार प्रसार करत आहेत.

| उत्तरदात्यांनी घेतलेल्या योजनांचा लाभ | माहितीचा स्रोत | | | | | | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | टी.व्ही. | रेडीओ | वृत्तपत्रे | साप्ताहिक | मासीके | टी.व्ही. व वृत्तपत्रे | | |
| सुकन्या समृद्धी योजना | – | – | – | – | – | ०७<br>१००% | ०७ | १४% |
| मुद्रा योजना | – | – | – | – | – | – | – | – |
| सुव्यवस्थित मातृत्व अभियान | ०१<br>१००% | – | – | – | – | – | ०१ | ०२% |
| कृषी सिंचाई योजना | – | – | ०५<br>१००% | – | – | – | ०५ | १०% |
| पंतप्रधान आवास योजना | – | – | – | – | – | १०<br>१००% | १० | २०% |
| शेतकरी बिमा योजना | ०४<br>४४.४४ % | – | ०५<br>५५.५६% | – | – | – | ०९ | २०% |
| जनधन खाती योजना | ०२<br>१००% | – | – | – | – | – | ०२ | ०४% |
| फसल बिमा योजना | – | – | – | – | – | – | – | – |
| खत योजना | – | – | – | – | – | – | – | – |
| कृषी कर्ज योजना | – | – | – | – | – | – | – | – |
| पंतप्रधान कौशल्य विकास योजना | – | – | – | – | – | – | – | – |
| सुकन्या, कृषी सिचाई, कृषी कर्ज व जनधन खाती व फसल बिमा | ०६<br>३७.५० % | ०२<br>१२.५०% | – | – | – | ०८<br>५०% | १६ | ३२% |

| अ.क्र. | ग्रामीण विकासातील प्रभावी माध्यम | उत्तरदात्यांनी संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मसिके | – | – |
| २. | टी.व्ही. | १० | २० |
| ३. | रेडीओ | ०२ | ०४ |
| ४. | वृत्तपत्रे | १० | २० |
| ५. | वृत्तपत्र, टी.व्ही. व रेडीओ | २८ | ५६ |
| | एकुण | ५० | १०० |

**सारांश :-**

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेले गाव हे गट ग्रामपंचायत असुन ११७२ त्याची लोकसंख्या आहे. शासनाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत १०० गाव हागणदारी मुक्त आहे. तसेच अधिकाऱ्यांकडे कोणत्याही योजने विषयी माहिती घेत असतांना 'संडास असेल तर बोला' या स्लोगण अंतर्गत संभाषण साधतात. या ग्रामपंचायती मध्ये शासनाच्या पंतप्रधान आवास योजना, जनधन खाती योजना, जलसिंचन अंतर्गत विहीरी, अपघात विमा, कृषी कर्ज योजना, सुकन्या समृद्धी योजनेचा लाभ घेतला आहे. या सर्व योजनांची माहिती टी.व्ही. वृत्तपत्रे व रेडीओ या माध्यमातुन त्यांना मिळाली आहे. तसेच ग्रामपंचायत अंतर्गत राष्ट्रीय पेयजल, रस्ते, पानंदरस्ते, स्मशानभूमी, नाले बांधकाम, स्वच्छ गाव, सायकल वाटप, सिमेंट बंधारे इत्यादी कामे झाली असून याची माहिती प्रसार माध्यमांमधून वेळोवळी मिळत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

1) *वृत्तसाधना. दि. 12 डिसेंबर, 2002.*

2) *लार्नर डॅनियल. पांसिग ऑफ ट्रेडिशनल सोसायटी पृ. 11.*

3) *ग्रामपंचायत पाहणी अहवाल. 2018-19. गट ग्रामपंचायत परसोडी ता. उमरेड, जि. नागपूर.*

4) *लोक संख्या अहवाल 2011.*

5) *ग्रामपंचायत पाहणी अहवाल. 2018-19. गट ग्रामपंचायत परसोडी ता. उमरेड, जि. नागपूर.*

6) *मुलाखत, सरपंच परसोडी गट ग्रामपंचायत. दि. 09.07.2019.*